# डॉ.आंबेडकर यांचे धर्म चिंतन

**उमेश भाऊराव इंगळ** M.Sc. Physics B.ed माध्यमिक शिक्षक महात्मा मुंगसाजी विद्यालय पुसद ता.पुसद जि.यवतमाळ

---

**प्रस्तावना :**

“ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे. तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे. ज्या धर्मात अमंगल पशुचा स्पर्श झाला असता चालतो. पण माणसाचा स्पर्श चालत नाही तो धर्म नसून तो वेडगळपणा आहे. जो धर्म एका वर्गाने विद्या शकू नये. धनसंचय करून नये शस्त्र धारन करू नये. असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाची विटंबना आहे. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून शिक्षा आहे.” (1)

**“डॉ.बाबासाहेब आंबेडकर’**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हि केवळ व्यक्ती नसून तो विचार आहे. हा विचार प्रेरणादायी आणि प्रवाही आहे. त्यांचे जीवन आणि कार्य हे तळागाळातील हजारो वर्षांच्या सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषणामुळे भरडलेल्या लोकांकरिता प्रेरणा आहे. हि प्रेरणा केवळ वैचारिक पातळीपूर्ती मर्यादित नाही तर झोपलेल्या समाजाला जागरूक करून त्यांच्यात स्वाभिमान, अस्मिता आणि आर्थिक सबलता निर्माण करण्याच्या कृती कार्यक्रम आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची साहित्य चळवळ, जीवन आणि कार्य यांचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की वंचित शोषितांच्या उन्नतीसाठी यांनी संपूर्ण आयुष्य खर्च केले. धनंजय कीर म्हणतात की “ नवभारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार, लोकशाहीचे त्राते आणि मानवी स्वातंत्र्याचे कैवारी बाबसाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र हे आधुनिक भारताच्या इतिहासाच्या प्रमुख पर्व आहे. मानव स्वातंत्र्याचे इतिहासाचे सोनेरी पान आहे”. याच बरोबर असे म्हणता येईल की, बाबासाहेब हे भारताच्या आधुनिक इतिहासातील एक महान आश्चर्य आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक कामगार इत्यादी विविध क्षेत्रात अत्यंत भरीव आणि विधायक कामगिरी केली आहे. एखादा महापुरुष एक किंवा दोन क्षेत्रात कार्यरत राहून महान होतो. पण बाबासाहेबांनी एकाच वेळी विविध क्षेत्रात उत्युंग भरारी मारलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचा कैवारी मसीहा आणि आरक्षणवादी अश्या संकुचित दृष्टीकोनातून पाहण्यात येते परंतु हे चुकीच आहे. ज्या अश्पृश हिंदू धर्मात त्यांचा जन्म झाला त्यांच्यावर लहानपणापासून होणारा अस्पृशता छळ, अन्याय सहन करून त्या काळात जगातील सर्वात जास्त डिग्री प्राप्त करणारा असा महामानव ज्याने समाजातून गुलामगिरी नष्ट केली. संविधान लिहून सर्वांना समतेचा अधिकार दिला. गुलामगिरी नष्ट करून स्वातंत्र्याचा अधिकार अस्पृशाना संविधानातून दिला. भारतातील अठरा पगड जातीतील लोकांना गुलामगिरीतून माणसात आणण्याचे कार्य डॉ.बी. आर .आंबेडकर यांनी केली. याची दखल घेणे समाजाने क्रमपात्र आहे. डॉ. आंबेडकर हे २० व्या शतकातील भारतामधील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे एक प्रमुख प्रणेते होते. शेकडो वर्ष धर्माच्या नावाने दडपल्या गेलेल्या तळागाळातील लोकांमध्ये स्वतःच्या हक्कांची जाणीव निर्माण करून ते मिळवण्यासाठी संघर्ष करण्यास त्यांनी त्यांना प्रवृत्त केले. इंग्रज राजवटीत त्यांनी सामाजिक सुधारणा केल्या. ते न्या.रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधी ईत्यादि सुधारकांनी सुधारणेच्या कार्यक्रमाला नैतिक अधिष्ठान मिळवून देताना धर्माचा अधिकार घेतला. आंबेडकर त्याच वातावरणात वाढले. त्यांचे वडील कबीर पंथी असून ते रोज कबिरांचे दोहे व संतांचे अभंग मुलांना म्हणायला लावीत. बाबासाहेबांनी मराठी संत कवींचा सखोल अभ्यासह केला. पुढे उच्च शिक्षणासाठी परदेशात गेल्यावर अर्थशास्त्र, समाजशास्त्र,मानवशास्त्र इत्यादी आधुनिक शास्त्राचा त्यांनी पद्धशीरपणे अभ्यास केला. साहजिकच आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांनी धर्माची चिकित्सा केली.

उद्दे :

1. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचा निर्णय का घेतला याचा अभ्यास.
2. हिंदू ज्याला धर्म म्हणतात ते काही नसून अनेक आज्ञा आणि प्रतिबंध आहेत याचा अभ्यास.
3. धर्म व धम्म यातील तुलनात्मक अभ्यास.
4. डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म का सोडला याचे चितन.
5. आंबेडकरांनी बौद्ध धम्म का स्वीकारला याचा अभ्यास.

प्रस्तुत अध्ययनात विविध पुराव्याचे संकलन केले आहे. त्यासाठी द्वितीय संकलन पद्धतीचा अभ्यास केला आहे. जसे विभिन्न संशोधन लेख, वर्तमानपत्र, लोकराज्य इ. चा उपयोग केला.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मचिंतन**

धर्म या शब्दाच्या निरनिराळ्या व्याख्या केल्या जातात. आंबेडकरांनी आपल्या लिखाणात धर्म आणि धम्म असा फरक केला आहे. परमेश्वराचे स्वरूप, त्याला प्रसन्न करून घेण्याचे मार्ग य संबधीच्या विचारला त्यांनी धर्म हे नाव दिले. धम्म हा त्यांच्या मते धर्माहून वेगळा आहे. वैयक्तिक व सामाजिक नीती म्हणजेच धम्म होय. अशी त्यांनी धम्माची व्याख्या केली आहे. जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे एकमेव ध्येय होऊ शकत नाही. व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे. व्यक्तीचा आत्मोनातील पोषक असे वातावरण उत्पन्न करणे हि धर्माची मुलभूत कल्पना आहे. व्यक्तीच्या विकासासाठी तीन गोष्टींची

आवश्यकता असते. त्या म्हणजे सहानुभूती, समता व स्वातंत्र्य या होत. ती मुल्ये ज्या धर्मामध्ये असतील तोच धर्म श्रेष्ठ होय, अशी आंबेडकरांची या बाबतीतील भूमिका आहे. (2)

**हिंदू धर्माची समीक्षा**

हिंदू धर्मात व्यक्तीला स्थान नाही हा आंबेडकरांच्या मते हिंदू धर्मातील मुख्य दोष होय. हिंदू धर्माची रचना वर्गाच्या कल्पनेवर केलेली आहे. एका माणसाने दुसऱ्याशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे. तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी अशी या धर्माने कर्तव्याची विभागणी केलीली आहे. ती अन्यायकारक आहे. विद्या शस्त्रे आणि पैसा यांची प्रत्येक माणसाला जरुरी आहे. जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला निशस्त्र करतो जो धर्म काहीना धम्म संपादनाच्या मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपल्या उपजीविकेकरिता दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अनुज्ञा देतो तो धर्म नसून तो स्वार्थपरायनता आहे". सारा हिंदू धर्म वरिष्ठ वर्गाच्या हिंदुनीवरिष्ठ वर्गाच्या संवर्धनाकरिता रचलेला आहे. शुद्रावर या धर्माचे सामाजिक व बौद्धिक गुलामगिरीच लादलेली आहे. असे आंबेडकरांचे म्हणणे होते. (3)

हिंदू धर्माने शूद्राला व्यवसाय स्वातंत्र दिलेले नाही. संपतीचा संचय करण्याचा त्याला हक्क नाही. त्याला वेदाध्ययनाचा नव्हे तर वेदांचे श्रवण करण्याचा अधिकारही मनुने नाकारला आहे. आपल्याच धर्मातील ग्रंथाचे श्रवण केल्याबद्दल क्रूर शिक्षा देणारा हिंदू एकमेव धर्म आहे. हिंदू धर्मात वरिष्ठ जातीबद्दल त्वेषाची आणि कनिष्ठाबद्दल तिरस्काराची भावना वाढीस लागते. शिवाय हिंदू समाजात पाच कोटी लोक अस्पृश्य आहेत. त्यांची वस्ती गावकुसाबाहेर असते. हिंदुच्या देवळात त्यांना प्रवेश मिळत नाही. शेकडो वर्षाच्या सांस्कृतिक प्रगती नंतर देशातील कोट्यावधी लोक अश्या अवस्थेत राहावेत. हे हिंदू धर्मातील स्वयंतृष्टता, इतरांच्या बाबतीतील उदासीनता व बंधुभावाचा अभाव यांचेच धोतक आहे.

**बौद्ध धर्माचा स्वीकार**

हिंदू धर्मात कल्पना हि ईश्वर केंद्रित आहे. तो आत्मा, कर्मकांड, पूजा अर्चा, पोथी-पुराणे यातच केंद्रित होतो. तो मोक्षाला महत्व देतो, मनुष्याला दुय्यम स्थान देतो. म्हणून डॉ. आंबेडकरांनी सन १९५६ साली हिंदू धर्माचा त्याग करून आपल्या हजारो अनुयायासह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. आंबेडकरांनी बौद्ध धम्मच स्वीकारला कारण बौद्ध धम्मात मध्यस्थाची गरज नाही. तो मार्गदाता हे स्वतः प्रकाशमय व्हा असे सांगतो धम्मातील सत्य हे अनुभवनिष्ठ आहे व विज्ञाननिष्ठ आहे. मनुष्याची विचारशक्ती आणि प्रयत्नातून त्यांचा उगम होतो धम्मामध्ये बुद्धाचे स्थान वेगळे नसून तो सर्वसामान्य आहे.

१९३५ ला केलेल्या धर्मांतराच्या घोषणेनंतर २१ वर्षांनी त्यांनी धर्मांतर केले या काळात त्यांनी सर्व धर्माचा अभ्यास केला. पण भारतीय परंपरेतील व माणसाला-माणुसकीची शिकवण देणारा बौद्ध धम्म त्यांना जवळचा वाटला. भारताच्या राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप असणाऱ्या बौद्ध धम्माची दीक्षा १४ आक्टोंबर १९५६ रोजी घेतली या धम्माचे आकलन व्हावे यासाठी "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहिला. (4)

**पारंपारिक आणि आंबेडकर प्रणीत बौद्धधम्म**

जगात दुख आहे हे बौद्ध धर्मातील एक मुलभूत संकल्पना आहे. जुन्या परंपरेप्रमाणे जन्म, जरा, व्याधी आणि मृत्यू हि दु:खांची कारणे मानले जातात पान जन्म हेच जर दुखांचे कारण मानले तर कोणताही धर्म किंवा तत्वज्ञान या जगात माणसाला सुख मिळवून देऊ शकणार नाही. जरा व्याधी आणि मृत्यू हि दुखांची कारणे असली तरी ती नैसर्गिक आहेत. ती कुणाला नाहीशी करता येणार नाहीत. बुद्धाने ज्या दुखांचा विचार केला ते दुख नैसर्गिक कारणामुळे निर्माण झालेली नाहीत. त्याची करणे सामाजिक आहेत. वर्गवर्गातील कलह हेच सामाजिक दुखांचे मूळ कारण होय. सामाजिक अन्याय, विषमता आणि संघर्ष या मधून दुखांचा उद्भव होतो. हि कारणे नष्ट करण्याचा मार्ग बुद्धाने दाखवून दिला आहे असा बाबासाहेबांनी बुद्धांच्या शिकवणुकीचा अर्थ सांगितला आहे. (५)

**पुनर्जन्म आणि कर्मवाद**

मानवी शरीर पृथ्वी, आप, तेज, वायू या द्रव्यांचे बनलेले आहे. मृत्युनंतर शरीरातील हि द्रवे त्यांच्या मूलद्रव्यात विलीन होतात. मरणानंतर माणसाच्या शरीरातून ऊर्जा निर्माण होत नाही. त्यांच्या शरीरातील ऊर्जा अवकाशातील उर्जेत मिळून जाते. या मूलद्रव्यांच्या संयोगातून पुन्हा नवे जिव निर्माण होतात. आत्म्याच्या पुनर्जन्मावर बुद्धाचा विश्वास नाही. जडाच्या बाबतीत मात्र तो उच्छेदवादी नाही. विज्ञानात उर्जेच्या चिरंतनत्वाचा जो सिद्धांत आहे. त्यांच्याशी बुद्धाचा सिद्धांत जुळणारा आहे. अशी आंबेडकरांनी या प्रश्नाची मांडणी केली. (६)

**कर्मवाद**

बुद्धाने कर्मवाद मानलेला आहे. विश्वातील कर्मनियमावर व्यवस्था परमेश्वरावर अधिष्ठीत नसून कर्मनियमावर आधारलेली आहे. माणसाने समाजहितकारक कर्म केली तर त्यांचा परिणाम नीतीच्या वृद्धीला पोषक होईल उलट अनैतिक कर्माचा परिणाम वाईट होईल. एकाच्या कर्माचा परिणाम कधी-कधी दुसऱ्याला भोगावा लागतो. या दृष्टीने, कर्मनियम अटल आहे, असा बुद्धाच्या कर्मवादाचा बाबासाहेबांनी अर्थ लावला.

**भिक्षुसंख:-**नीतीवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी कोणताही भेदभाव न करता सर्व जातीच्या स्त्री-पुरुषांना धर्माचा उपदेश केला. केवळउपदेशातून आदर्श समाज निर्माण होणार नाही. त्या साठी त्यांनी भिक्षुसंघ स्थापन केला. बाबासाहेबांच्या मते भिक्षुसंघ हि बुध्दप्रणीत धर्माचे आचरण करणाऱ्या आदर्श समाजाची एक प्रतिकृती होती. (७)

**बुद्ध आणि कार्लमार्क्स**

१९५६ साली काठमांडू येथे जागीतिक बौद्ध परिषदेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात बाबासाहेबांनी जे भाषण केले त्यामध्ये गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्या शिकवणुकीची त्यांनी तुलना केली. मार्क्स ज्याला पिळवणूक म्हणतात त्याला बुद्धाने दु:ख म्हटले आहे. मार्क्स ने खाजगी मालकीचा विरोध केला तर गौतम बुद्धाची शिकवण उदात्त असली तरीही वैयक्तिक नीतीची शिकवण आहे. मार्क्स प्रणीत शोषण आणि बुद्धप्रणीत दु:ख या दोन्ही संकल्पना समान आहेत. याला वस्तूस्थिती चा आधार नाही.

बाबासाहेबांनी उत्पादनाची साधने व उपभोगाची वस्तू यातील फरक ध्यानात घेतलेला नाही. भिक्षूने केवळ सात वस्त्रू आपल्यापाशी ठेवाव्या या नियमामाघील प्रेरणा वैराग्याची आहे. त्याच बरोबर पावसाळ्याचे चार महिने सोडून उरलेल्या आठ महिन्यात भिक्षूनि सतत परिभ्रमण करावे. कोणत्याही ठिकाणी दोन रात्रीपेक्षा अधिक काळ वस्ती करू नये. मध्यान्ह उलटल्यावर काही खाऊ नये, असे निर्बंधही बुद्धाने भिक्षुकावर घातलेले आहेत. मार्क्स यांची शिकवण वैराग्याची नाही. उपभोगाच्या वस्तूवर त्याने कोणत्याही मर्यादा घातल्या नाहीत. उलट प्रयेक माणसाला त्याच्या शारीरिक,मानसिक व बौद्धिक विकासासाठी आवश्यक अश्या सुविधा उपलब्ध करून देणे, हे त्यांच्या समाजवादाचे एक उद्दिष्ट आहे.

भिक्षु संघाचा व्यवहार गणराज्याच्या म्हणजेच लोकशाहीच्या तत्वावर चालत असे. गौतम बुद्धाचा जन्म शाक्य गणामध्ये झालेला असल्याने त्याच्या कामकाजाची पध्दती बुद्धाला माहित होती.राजेशाही पेक्षा त्यांना ती श्रेष्ठ वाटल्यामुळे भिक्षुसंघासाठी त्यांनी तिचा अंगीकार केला. पण लोकशाही हि सामाजिक प्रश्नाबाबत निर्णय घेण्याची केवळ एक पद्धती आहे. लोकशाहीत आर्थिक व सामाजिक विषमता राहू शकते. बुद्धाच्या काळी शाक्य गणामध्ये हि क्षत्रियांचा एक राज्यकर्ता वर निर्माण झाला होता. तेव्हा भिक्षु संघ हि स्वप्नाळू समजवाद्यांच्या वसाहती प्रमाणे समाजवादी बेटे होती. असा जो निष्कर्ष काही संशोधकांनी काढला आहे. तो साफ चुकीचा आहे. समाजवाद हे स्वतः श्रमिकांचे राज्य आहे. श्रमिकांचे शोषण व्हावयाचे नसेल तर ज्या साधनांच्या द्वारे ते वस्तूचे उत्पादन करतात. ती उत्पादन साधने त्यांच्या मालकीची करावीत, असे समाजवाद्यांचे म्हणणे होते.

१९ व्या शतकात बँटीस्ट, स्वेकर्स यांच्या सारखे परमेश्वराचे राज्य पृथ्वीतलावावर आणू पाहणारे खिस्ती धर्मपंथ आणि फुरेये यांच्यासारखे स्वप्नाळू समाजवादी यांच्या अनुयायांनी अमेरिकेतील मोकळ्या जमिनीवर साम्यवादाचे काही प्रयोग केले. त्यांच्या वसाहती शरीरश्रम सहकार्य, उत्पादनसाधनांची सामुहिक मालकी आणि लोकशाही मुक्त करणे, हे त्यांचे उद्दिस्ट होते. या वसाहतींना भांडवलशाहीच्या सागरावरील समाजवादी बेटे म्हणता येईल.

बौद्ध विहार हि अशी श्रमिकांची वसाहत नव्हती. भिक्षुचा निर्वाह भिक्षेवर म्हणजे दुसऱ्यांच्या श्रमाने उत्पन्न झालेल्या अन्नावर होत असे. विनय पाटीकेतील भिक्षुसाठी असलेल्या नियमात शारीरिक श्रमाची अट नाही. विहाराच्या मालकीच्या जमिनी होत्या त्या पासून त्यांना खंड मिळे. बहुतेक प्रमुख विहार खुष्कीच्या व्यापारी मार्गावर असून त्यांना लागून व्यापाऱ्यांचे गाडीतळ व विश्रांती स्थाने असत. या व्यापाऱ्यांना कर्ज देणे हे विहारांना उत्पन्न मिळविण्याचे एक साधन होते. भिक्षा खंड आणि व्याज या सारख्या अनर्जित उत्पन्नावर भिक्षु संघाचा निर्वाह होत असल्यामुळे त्यांची शोषक वर्गातच गणना करावी लागेल. त्यांची तुलना करावयाची झाल्यास ती आदर्श समाजवादी वसाहती ऐवजी आधुनिक काळातील विद्यापीठाशी करावी लागेल. नालंदा आणि तक्षशीला हि अशी विद्यापिठेच होती.

बुद्ध आणि मार्क्स यांच्या शिकवणुकीत साम्य आहे. हे सिद्ध करण्यासाठी बुद्धांच्या उपदेशाची खूप ओढाताण करावी लागते आणि मार्क्स यांच्या विचारातील गुंतागुंत काढून टाकून त्यांचे सोपे समीकर मांडावे लागते. त्यामधून दोघांच्याही विचारांचा विपर्यास होतो.

वास्तविक पाहता फुले ज्याला 'सार्वजनिक सत्यधर्म' म्हणतात; त्या सार्वजनीक नीतीची शिकवण देणारा बौद्धधर्म हा जगातील पहिला धर्म होय. भारतीय संस्कृतीवर त्याचा खूप मोठा प्रभाव पडलेला आहे. हिंदू धर्मातील मध्ययुगीन भक्तिमार्ग संतानी हि या परंपरेतून प्रेरणा घेतलेली आहे. मात्र पंचवीस वर्षापूर्वी उत्पन्न झालेल्या कोणत्याही धर्मात आजच्या प्रश्नाला उत्तरे सापडतील हे व्यर्थ आहे. बाबासाहेबांची व्यक्ती स्वातंत्र्य, समानता आणि बंधुभाव या मूल्यावर दृढ श्रद्धा होती.

हिंदू धर्म त्यांना पोषक नसल्याने त्यांनी त्यांचा त्याग केला. आणि बौद्ध धर्मस्वीकारला मात्र धर्महि प्रत्येकाची खाजगी बाब आहे. राष्ट्र व धर्म या कल्पना वेगळ्या आहेत. राष्ट्राची उभारणी सार्वजनिक नीतीच्या तत्वावरच झाली पाहिजे. हे त्यांना हि मान्य होते. म्हणून धर्माची ओढाताण करून त्यामधून आजच्या समस्यांना शोधन्याऐवजी बाबासाहेबांनी प्रमाण मानलेल्या मुल्यांचा प्रकाशात शास्त्र शुद्ध पद्धतीने सामाजिक प्रश्नाचा अभ्यास करणेच अधिक श्रेयस्कर ठरेल. (8)

**धर्म आणि धम्म**

बाबासाहेबाच्या धर्मातराला दोन पैलू होते: पहिला हिंदू धर्माचा विकास व दूसरा बौद्धधर्माचा स्वीकारहा होय. हिंदूधर्माचा त्याग या धर्माने लादलेल्या मानसिक बेड्यामधून दलितांची मुक्तता झाली. खेड्यातील आर्थिक जीवन अध्यापही जुन्या रूठीशी व काही प्रमाणात देवालयांशी हो भिगडित हिंदू धर्माचा त्याग केल्यावर दलितांच्या वाट्याला आलेली गलिच्छ व अपमानास्पद अशी काम त्यांनी सोडून दिली. शिक्षणाची इच्छा नव्यानेच त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यापैकी अनेकांनी खेडी सोडून शहरात प्रवेश केला. बौद्ध धर्माच्या स्वीकाराणे एक नवी अस्मिता त्यांना प्रदान झाली आणि तिच्यामधून त्याच्या चळवळीचा सामर्थही अनेक

पटींनी वाढले. आंबेडकरांना 'द बुध्द अँड हिज धम्म। या पुस्तकात त्यांनी अनेक ठिकाणी Religion हा शब्द बुद्धाला अभिप्रेत असलेल्या धम्माला उद्देशून वापरला आहे. आंबेडकर म्हणतात बौद्ध धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. आणि हा केवळ एक धर्मच नसून एक श्रेष्ठ सामाजिक सिद्धांत आहे. सर्वप्रथम डॉ.आंबेडकर धर्म आणि धम्म यात फरक केला होता.

- **धर्म आणि धम्म यातील फरक** *

धर्म :- १) धर्मा मध्ये सत्याची कल्पना हि इश्वर केंद्रित आहे. ती ईश्वरा भोवती फिरत असल्याने सत्य पडताळून पाहण्याची व्यवस्था नाही.

२) धर्म जग काय आहे ते सांगतो तो वर्णनात्मक आहे.

३) आत्मा, कर्मकांडे, पूजा – अर्चा पोथी-पुराने धर्माच्या अनुषंगाने निर्माण होतात.

४) धर्म दुख पचवण्यास भाग पाडतो

५) धर्मामध्ये आत्म्याच्या शोध आहे. त्यामुळे मोक्षाला महत्व आहे.

६) धर्म, ईश्वर केंद्रित असल्याने मुख्याला दुय्यम स्थान देऊन ईश्वर आणि मनुष्याच्या संबंधाचे विचार आहे.

७) धर्मात मोक्षाकडे घेऊन जाणारा प्रेषित असते.

**धम्म :**

1. धम्म हा माणसा-माणसातील संबंधाचे विश्लेषण करतो, त्यामुळे सार्वजनिक आहे.
2. बुद्ध हा धम्मात मार्गदाता आहे. मोक्षदाता नाही.
3. धम्मामध्ये मध्यस्थाची पद्धत नाही.
4. धम्मामध्ये बुद्धाचे स्थान वेगळे नसून तो सर्वसामान्य आहे.
5. धम्मामध्ये उत्तराधिकारी नाही, तर स्वतः प्रकाशमय व्हा.
6. धम्माला राजकीय सत्तेचे बळ नाही. धम्म व्यक्तीचा वैचारिक परिवर्तनाची शक्ती आहे. हि खरी धम्माची ताकद आहे.
7. धम्मात साक्षात्कार नाही तो कोणी निर्माण केला नाही. डॉ. आबेंडकरांच्या मते, धम्म हा एक शोध आहे. तो मानवी जीवनाला सखोल अभ्यासातून उद्भलेला आहे.
8. धम्म बुद्धीवादावर आधारलेला असल्याने त्यात बुद्धिवादाला वाव आहे. सत्यशोधक वृत्ती न्यायबुद्धी यांचा अंतर्भाव आहे.
9. धम्मातील सत्त्य हे अनुभव निष्ठ आहे व विज्ञाननिष्ठ आहे. मनुष्याची विचारशक्ती आणि प्रयत्नातून त्याचा उगम होतो
10. धम्म जग काय आहे याचे विश्लेषण करून ते बदलण्याची भाषा करतो. (9)

बाबासाहेबांच्या मते सर्वसामान्य माणसे धर्मनिरपेक्ष नीतीमूल्यांसाठी सहसा स्वार्थाचा त्याग करीत नाहीत. नीतीला धर्माची जोड असेल तर मात्र त्या मुल्यासाठी स्वतःच्या स्वार्थावर पाणी सोडण्यास ती तयार होतात. म्हणून "धर्म" हि एक सामाजिक शक्ती आहे. त्याचे हे म्हणणे सर्वांनाच पटेल असे नाही. राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि समाजवादी क्रांती यासाठी आपले प्राण पणाला लावणारे शेकडो क्रांतिकारक, जगातील निरनिराळ्या देशांत होऊन गेले आहेत. मात्र लोकांच्या मनावर जुन्या संस्कारांचा प्रभाव असल्यामुळे धर्माचे आवाहन त्याहून किती तरी अधिक लोकांना होते. हे बाबासाहेबांचे म्हणणे खरे आहे. पण धर्माचे हे बलस्थान म्हणजे माणसाला अस्पृश्याबदल वाटणारी भीती हे होय आपण पाप केले तर परमेश्वर कधी ना कधी आपल्याला शिक्षा केल्या खेरीज राहणार नाही अशी ईश्वर वाद्यांची खात्री असते त्याचप्रमाणे या जन्मात नाही तरी पुढील जन्मात तरी आपल्याला आपल्या पापाची फळे भोगावयास लागतील हि भीती पौरात्य धर्मानी आपल्या अनुयायांच्या मनावर बिंबवली आहे. या भीतीमुळेच माणसे पापापासून प्रवृत्त होतात. अदृश्यांची हि भीती काढून टाकली आणि जडवादाला 'धम्म' असे नाव दिले तर नितीमुल्याना धर्माचे पावित्र्य प्राप्त होईल का या बद्दल शंकाच आहे.

शंकराचार्य ज्ञानेश्वर, टिळक यांनी आपआपल्या परीने गीतेचा निराला अर्थ लावला असला तरी ते सर्व विचारवंत अध्यात्मवादी होते. जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य, पूनर्जन्म कर्मवाद इत्यादी मुलभूत संकल्पना त्यांनी मान्य केली.

बाबासाहेबांनी अदृश्याची कल्पना नाकारून बौद्ध धर्माचा आधुनिक उदारमतवादाशी जुळला असा अर्थ लावला आहे. मग जडवादी नीती मुल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी धर्माची चौकट का वापरली, असा प्रश्न आपल्या मनात उभा राहतो. धर्मानंतर हा केवळ राजीकीय डाव होता. असा त्यांच्या विरोधकांनी त्यांच्यावर आरोप केला आहे. सर्वसामान्य दलितांच्या मनावर धर्माचे दृढ संस्कार होते. त्यांना हिंदू धर्माचा त्याग करण्यास प्रवृत्त करण्यासाठी पर्यायी धर्म त्यांच्या समोर ठेवणे आवश्यक होते. असे त्यांचे अनुयायी त्यांच्या धर्मांतराचे समर्थन करतात. कारण काही असो नवा विचार जुन्या धर्माच्या चौकटीत बसवला गेल्यामुळे बौद्धांच्या चळवळीत काही समस्या निर्माण झाल्या आहेत. धर्मांतरामुळे जुन्या बौद्ध ग्रंथाची प्रतिष्ठा वाढली आहे. परदेशातून जे बौद्ध भिक्षु भारतात येतात ते या जुन्या धर्माचाच प्रचार करतात येथे हि बौद्ध धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली त्यांनाही पारंपारिक बौद्ध धर्म आणि आंबेडकर प्रणीत नवा बौद्ध विचार यांच्यातील नेमक्या भेदाची स्पष्ट कल्पना आहे असे दिसत नाही. बौद्धा मधील काही सुशिक्षित तरून विपश्यनेच्या मागे लागले आहेत्त. यावरून हे स्पष्ट होते. जडवाद आणि धर्म यांची हि सांगड नव-बौद्धांच्या विचारात गोंधळ गाजविण्यास कारणीभूत आहे. (१०)

मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने बौध्द धर्माला "विचारवंताचा धर्म" असे म्हटले आहे. बौध्द धर्माचा गाभा बुद्धीनिष्ठ असल्यामुळे तो विचारवंताना आकर्षण घेणार धर्म ठरला यात शंकाच नाही. पण सर्वसामान्य माणसे अशी स्वयंपूर्ण नसतात त्यांच्या मनात परमेश्वराबद्दल भीती असते. पण त्याच बरोबर त्यांना त्याचा आधारही वाटतो. ईश्वर संकटकाळी आपल्या पाठीशी आहे. त्या मुळे त्यांना दिलासा मिळतो.

गौतम बुद्धाचा धर्म मानवाला पूर्णपणे स्वाश्रयी बनविणारा होता. पुढे महायान पंथाने त्याला भक्तीची जोड दिली. त्या नंतर आशिया खंडात त्याचा सर्वत्र प्रसार झाला. बाबासाहेबांचा ओढा महायान पंथापेक्षा थेरवादाकडे अधिक होता. पण या तत्वज्ञानातून भक्ताला असा दिलासा मिळत नाही. मग नकळत बुद्धीचीच देव म्हणून पूजा सुरु होते. बौध्द धर्म स्विकारल्यावर कधी उघड किंवा गुप्तपणे जुन्या देवतांची पूजन चालू राहते हि प्रवृत्ती वाढत गेली तर बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली सामाजिक क्रांती घडून येणार नाही.

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म हिंदू धर्मात झाला पण हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेमुळे त्यांना खूप जास्त मानसिक त्रासाला सामोरे जावे लागेल. एक उच्च शिक्षित व्यक्तीला एवढ त्रास सहन करावा लागेल. तर आपल्या समाजबांधवाला केवढा त्रास सहन करावा लागत आहे. हे पाहून त्यांनी सामाजिक जागृतीचा मार्ग स्वीकारला. समाजाला संघटीत करून समाज शिक्षित करण्याचे व अन्यायाविरुद्ध लढविण्यासाठी प्रेरित करण्याचे कार्य केले.

आंबेडकरांचा जन्म अस्पृश्य जातीत झाला त्याचे चटके त्यांनी सहन केले. जाती व्यवस्थेचे चटके त्यांनी सहन केले व जातीव्यवस्थेला मुळापासून उखाडण्याचे कार्य त्यांनी राज्यघटना लिहून पूर्ण केले. डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची संकल्पना स्पष्ट होती. ती अशी कि हिंदू धर्मात अस्पृश्यांना सहानुभूतीची वागणूक मिळत नाही. जो धर्म जाती व्यवस्थेचा पुरस्कार
करून माणसा-माणसात भेद करतो, ज्या धर्मात स्वातंत्र, समता, बंधुता नाही त्या धर्मात राहून अस्पृश्यांना उद्धार होणार नाही. म्हणून त्यांनी १३ ऑक्टोंबर १९३५ रोजी नाशिक जवळील येवला येथे धर्मांतराची घोषणा केली. त्या नंतर २० वर्षात त्यांना अपेक्षित बदल हिंदू लोकांच्या वागणुकीत दिसला नाही. म्हणून त्यांनी देशविदेशातील सर्वच धर्माचा अभ्यास केला व त्यांनी सर्वात चांगला व माणसाला माणुसकीची वागणूक देणारा विज्ञानवादी धम्म म्हणून बौद्ध धम्म १४ आक्टोंबर १९५६ रोजी नागपूर मध्ये महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा घेतली व लाखो अनुयायासह धर्मांतर केले.

**संदर्भ सूची :**

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेख आणि भाषणे खंड ३.
2. तव, पृ.३५
3. तत्रेव, पृ.३५
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ पृ.२३४
5. तत्रेव, पृ.२२-२४
6. तत्रेव, पृ २४२ – २४८
7. तत्रेव, पृ .३११ – ३१९
8. आंबेडकर आणि मार्क्स : रावसाहेब कसबे
9. धर्म आणि धम्म : बी.आर.आंबेडकर
10. इंटरनेट